**<u>ठळक बातम्या</u>**

- गुढीपाडव्यासह नववर्ष स्वागताच्या विविध सणांचा देशभरात उत्साह राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा
- मध्यम, लघु आणि सूक्ष्म उद्योगाचं संरक्षण सिद्धतेत महत्त्वाचं योगदान असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- पुद्दुचेरीसह ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग

**आणि**

- चीनमधले भारताचे राजदूत म्हणून विक्रम दोराईस्वामी यांची नियुक्ती

**<><><><><>**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा तसंच चैत्र शुक्लादि, उगादी, चेटी चंड, नवरेह आणि साजिबू चेरोबा, हे सण देशाच्या विविध भागात आज साजरे होत आहेत. नवीन वर्षाच्या आणि वसंताच्या आगमनाचे हे उत्सव रबी हंगामातल्या सुगीचा सोहळा असतात. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना या सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण म्हणजे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेचं प्रतीक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जनतेला या सणांनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. चैत्रीनवरात्राचा प्रारंभ आज होत असून त्यानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रातल्या जनतेला गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देणारं विशेष पत्र त्यांनी लिहीलं आहे.

महाराष्ट्रात गुढीपाडव्यानिमित्त मुंबई आणि इतर शहरांमधे शोभायात्रा काढण्यात आल्या. ऐकूया त्याविषयीचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून ....

# होल्डा व्हिसी

*(गुढीपाडव्याचा सण राजधानी मुंबईत पारंपरिक उत्साहाने साजरा होत आहे. नववर्षाचा प्रारंभ देवदर्शनाने करण्यासाठी शहरातल्या मंदिरांमधे पहाटेपासून रांगा लागल्या आहेत. घरोघरी रेशमी वस्त्र आणि कलश धारण केलेल्या गुढ्या उभारुन त्यांची पूजा करण्यात आली. मिष्टान्नाचं भोजन करण्याची प्रथा असल्यानं मिठाईच्या दुकानांमधे गर्दी झाली आहे. रस्त्यांवरच्या शोभिवंत रांगोळ्या,झेंडूच्या फुलांची सजावट, रंगीबेरंगी पारंपरिक पोषाख, सामाजिक संदेश देणारे फलक आणि चित्ररथ तसंच वाजत गाजत केलेल्या करतब कसरती हे गुढीपाडव्याच्या शोभायात्रांचं वैशिष्ट्य. ढोल, लेझीम लाठीकाठी, मल्लखांब अशा खास मराठी खेळांचं दर्शन या शोभायात्रांमधून घडत आहे. समृद्धी आणि पराक्रमाच्या परंपरेचा संदेश देणाऱ्या या शोभायात्रा ठाणे, डोंबिवली आणि इतर ठिकाणी निघाल्या आहेत. मनोरंजनाच्या मोठ्या आणि छोट्या पडद्यावरच्या अनेक मान्यवरांनी या शोभायात्रांमधे हजेरी लावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरमधे नववर्ष स्वागत यात्रेत सहभागी झाले. )*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अयोध्येतल्या राम मंदिरात विशेष धार्मिक विधीचा भाग म्हणून दीडशे किलो वजनाचं सोन्याचा थर चढवलेलं ‘श्रीराम यंत्र’ स्थपित केलं. राष्ट्रपतींनी हे यंत्र मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरच्या गर्भगृहात विधिवत पूजा अर्चनेनंतर आणि मंत्रोच्चारांसह स्थापित केलं. यावेळी उत्तर प्रदेशाच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल तसंच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. स्वामी विजयेंद्र सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेलं हे यंत्र वैदिक गणितावर आधारित असून सकारात्मक आध्यत्मिक ऊर्जा निर्मितीसाठी त्याची रचना करण्यात आली आहे.

**<><><><><>**

सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राचे महत्वाचे आधारस्तंभ म्हणून उदयाला येत आहेत असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज केलं. नवी दिल्लीत राष्ट्रीय संरक्षण उद्य़ोग परिषदेत ते बोलत होते. भारताची तंत्रज्ञानक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने स्टार्टअप नवोद्योजक आणि संशोधक महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबद्दल सरकार सजग असून भारतीय निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी योग्य पावलं उचलत आहे, असं प्रतिपादन परकीय व्यापार महासंचालक लव अग्रवाल यांनी आज केलं. नवी दिल्लीत वार्ताहर

परिषदेला ते संबोधित करत होते. पश्चिम आशियातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं निर्यातदारांसाठी दिशानिर्देश जारी केल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><>

पश्चिम आशियामध्ये एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या विमानकंपन्यांच्या एकूण अठ्ठेचाळीस विमानउड्डाणे आजपासून सुरु होतील. या दोन्ही कंपन्यांची जेद्दा आणि मस्कतमध्ये नियमित विमानसेवा सुरु राहिल. एअर इंडियाची विमाने दिल्ली आणि मुंबई पासून तर एअर इंडिया एक्स्प्रेसची विमाने बंगळुरू, हैदराबाद आणि कोझिकोळ्ळ इथून निघतील.

<><><><>

राष्ट्रीय महामार्गांवरच्या टोल संकलनात पारदर्शकता आणि सुगमता रहावी याकरता केंद्रसरकारने राष्ट्रीय महामार्ग नियमांच्या सुधारणेची अधिसूचना जारी केली आहे. यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास तसंच कायदेशीर आर्थिक संरक्षण वाढेल असं या नियमात म्हटलं आहे. टोल चुकवणाऱ्यांकडून वसुली, ई नोटीस एसएमएसद्वारे पाठवण्याची सुविधा,याबरोबरच टोल दात्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी वेगळं पोर्टल इत्यादी नवीन बाबींचा समावेश या नियमांमधे केला आहे.

<><><><>

पुद्दुचेरीसह चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध पक्षांनी उमेदवारी याद्या जाहीर केल्या असून उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात झाली आहे.

केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांनी धर्मदोम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. विजयन सातव्यांदा विधानसभा निवडणूक लढवत असून या मतदासंघातून ते तिसऱ्यांदा निवडणूक लढत आहेत. विजयन यांच्याविरोधात यूडीएफचे व्ही पी अब्दुल रशीद तसंच भाजपचे के रंजित निवडणूक लढवत आहेत.

भाजपाने केरळ विधानसभा निवडणुकीसाठी ३९ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. मिझोरामचे माजी राज्यपाल के. राजशेखरन हे अरनमुला मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. या मतदारसंघातून डाव्या आघाडीकडून आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज तर यूडीएफकडून अबीन वर्की निवडणूक लढवत आहेत. भाजपाने पहिल्या यादीत ४७ उमेदवार जाहीर केले असून आतापर्यंत ८६ उमेदवार रिंगणात उतरवले आहेत.

तमिळनाडूमधे विविध पक्षांमधे युती-आघाड्याच्या चर्चा सुरू असून उमेदवार निवडीच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. आण्णा द्रमुकसोबत युतीसाठी एक ते दोन दिवसांत चर्चा केली जाईल असं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष नायनार नागेंद्रन यांनी सांगितलं. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या नेतृत्वाखाली ही चर्चा होणार आहे. दुसरीकडे माजी मुख्यमंत्री पलानीसामी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीला रवाना झाले आहेत. द्रमुकच्या नेतृत्वाखालच्या आघाडीमधेही जागावाटपाची चर्चा सुरू आहे.

तमिळनाडूमधे आण्णा द्रमुक पक्ष विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके पक्षासोबत युती करणार असल्याची शक्यता आण्णा द्रमुकचे नेते के टी राजेंत्र बालाजी यांनी फेटाळून लावली. विजय यांचा पक्ष तमिळनाडूच्या राजकारणात फारसा प्रभाव टाकू शकणार नाही असं बालाजी म्हणाले.

भारतीय जनता पक्षाने आसाम विधानसभा निवडणुकीसाठी ८८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा जलुकबारी मतदारसंघातून निवडणूक लढवतील. राज्यसभा खासदार रामेश्वर तेली, माजी खासदार राजदीप रॉय, भाजपा नेते रणजीत कुमार दास यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

गोव्यामधल्या पोंडा विधानसभा मतदारसंघासाठी आम आदमी पक्षाने गीतेश नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नाईक यांनी काल आपमधे प्रवेश केला. ९ एप्रिलला पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

भाजपानं आज विविध राज्यातल्या आगामी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपा नेते अमित शहा आणि राजनाथ सिंह यांच्यसह अनेक सदस्य उपस्थित होते.

**<><><><><>**

चीनमधले भारताचे राजदूत म्हणून विक्रम दोराईस्वामी यांची नियुक्ती झाली आहे. दोराईस्वामी हे १९९२ च्या भारतीय परराष्ट्र सेवेतले अधिकारी असून सध्या ते युनायटेड किंगडम मधे उच्चायुक्त म्हणून कार्यरत आहेत. भारत आणि चीनमधले द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या दृष्टीने दोराईस्वामी यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. दोराईस्वामी प्रदीप कुमार रावल यांची जागा घेतली.

**<><><><><>**

एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष अतनु चक्रवर्ती यांनी कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला आहे. बँकेत गेल्या २ वर्षात झालेल्या घडामोडी आणि कार्यपद्धती आपल्या व्यक्तिगत नीतीमूल्यांच्या विरोधात होत्या, असं कारण चक्रवर्ती यांनी दिलं आहे. त्यांचा कार्यकाळ मे २०२७मधे संपणार होता. चक्रवर्ती यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर माजी मुख्य कार्यकारी अधिकारी केकी मेस्त्री यांची तात्पुरती नेमणूक करायला रिझर्व बँकेनं मंजुरी दिली आहे.

**<><><><><>**

ऑरलियन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या राऊंड ऑफ १६ मध्ये आज, भारताच्या आयुष शेट्टीचा सामना जपानच्या युदाई ओकिमोतो बरोबर होणार आहे. आयुषनं काल झालेल्या सामन्यात आपल्याच देशाच्या किरण जॉर्जला नमवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

महिला एकेरीत आज अनमोल खरब हिचा सामना तन्वी शर्मा सोबत तर मालविका बंसोडचा सामना मलेशियाच्या बॅडमिंटनपटू सोबत होणार आहे.

राऊंड ऑफ मध्ये पोहचलेल्या इशारानी बरुआचा सामना कॅनडाच्या वेन यू झांग सोबत होणार आहे.

भारताचे अर्जुन मदाथिल आणि हरिहरन अमसाकरुणन् याआधीच राऊंड ऑफ १६ मध्ये पोहोचले आहेत.

//<><><><><>//